प्रकल्पग्रस्तांना शासकीय /निमशासकीय सेवेत गट-क व गट-ड मधील पदांवर नियुक्ती देतांना उच्चतम वयोमर्यादा शिथिल करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय, क्रमांक प्रकल्प-१००६/मु.स.३९६/प्र.क्र.५६/०६/१६-अ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ३ फेब्रुवारी,२००७.

संदर्भ : १) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय, क्रमांक एसआरव्ही-१०७८/पीएपी/१२, दि.२२.९.१९७८.
२) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय, क्रमांक एईएम-१०८०/३५/१६-अ, दि.२१.१.१९८०.
३) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय, क्रमांक एसआरव्ही-१०९४/१००४/प्र.क्र.३०/१६-अ, दि.१७.११.९४.
४) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय, क्रमांक एईएम-१०९९/प्र.क्र.४७/९९/१६-अ, दि.२४.२.२०००.
५) सामान्य प्रशासने विभाग,शासन निर्णय, क्रमांक विसआ-१००१/६०/प्र.क्र.१३९/०१(भाग-१)/१६-अ, दि.३०.५.२००३.
६) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय , क्रमांक एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१९/२००४/१२, दि.१७.८.०४.
७) सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्र.न्याप्र.१००३/९९/प्र.२/०३(भाग-२)/१६-अ, दि.२५ १०.०५

**प्रस्तावना :-**

प्रकल्पग्रस्त किंवा त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती यांना बृहन्मुंबई बाहेरील शासकीय व निमशासकीय सेवांमधील गट-क (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) व गट-ड मधील पदांवर नियुक्त्या देताना संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये उच्चतम वयोमर्यादा तीन वर्षांनी शिथिल करण्यात आली होती. तसेच संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये बृहन्मुंबईतील शासकीय निमशासकीय कार्यालयातील गट-ड मधील पदांवरील प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्त्यांसाठीही ही सवलत देण्यात आली होती. सदंर्भाधीन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्पग्रस्तांना शासकीय व निमशासकीय सेवांमध्ये नियुक्त्या देण्यासाठी एकूण संवर्ग बळाच्या ५% पदांवर सर्वोच्च प्राथम्य देण्यात आले असून संदर्भाधीन क्र.३ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या सर्वोच्च प्राथम्यक्रमात भूकंपग्रस्तांचाही समावेश करण्यात आला आहे. संदर्भाधीन क्र.५ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्पग्रस्तांना शासकीय /निमशासकीय सेवेतील गट-क व गट-ड मधील पदांवर नियुक्त्या देण्यासाठी उच्चतम वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३५ वर्षापर्यंत व मागासवर्गीयांसाठी ४० वर्षांपर्यंत शिथिल करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. आता संदर्भाधीन क्र.६ च्या शासन निर्णयान्वये शासन सेवेतील प्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३३ वर्ष व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्ष ठरविण्यात आली आहे. यामुळे प्रकल्पग्रस्तांना वयोमर्यादेत देण्यात आलेली शिथिलता अबाधित राहणे अपेक्षित आहे. हे विचारात घेऊन शासनाने आता पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

प्रकल्पग्रस्तांना शासकीय /निमशासकीय सेवेतील गट-क व गट-ड मधील पदांवर नियुक्त्या देण्यासाठी सर्वसाधारण उच्च वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षांपर्यंत शिथिलता देण्यात यावी. प्रकल्पग्रस्तांच्या आरक्षणामध्ये भूकंपग्रस्तांचाही समावेश असल्याने सदर आदेश भूकंपग्रस्तांनाही लागू आहेत. सदर वयोमर्यादा सरसकट शिथिल केली असल्याने मागासवर्गीय प्रकल्पग्रस्त उमेदवारांनाही ४५ वर्षापर्यंतचीच सवलत राहील.

संदर्भाधीन क्र.७ नुसार पदभरतीबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने तसेच मा.प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेल्या

कृ.मा.प.

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा - EB
आवक नं. ८८०७
20 FEB 2007
विशेष नोंद वहीनं
कार्यविवरण नं.

D:\BACKUP\DANGARE\Gg1\17.

ROTA/H-1960 (5,000-02-07)

निर्देशानुसार "शासनाने शासकीय सेवेत गट-क आणि गट-ड सेवाभरतीची एकत्रित मार्गदर्शक तत्त्वे शासन परिपत्रक क्र.न्याप्र.१००३/९९/प्र.२/०३(भाग-२)/१६-अ, दि.२५ ऑक्टोबर,२००५ अन्वये निर्गमित करण्यात आली आहेत. त्यानुसारच पदभरती करणे आवश्यक आहे."

हे आदेश शासकीय सेवा, शासकीय मंडळे, महामंडळे, महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हापरिषदा आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार राज्य शासनाला आहे, अशी प्राधिकरणे, सेवा व संस्था यामधील नियुक्त्यांसाठी लागू राहतील.

हे आदेश या शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( परमेश्वर जकिकोरे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,